महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला

# ३८ वा

# वार्षिक अहवाल

# २०१४-२०१५

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | सभेचीसुचना | ०३ |
| २ | संचालकाचा अहवाल | ०७ |
| ३ | सचिवाचा अहवाल | २४ |
| ४ | लेखापरीक्षकाचा अहवाल | २७ |
| ५ | ताळेबंद | ३२ |
| ६ | नफातोटा पत्रक | ३३ |
| ७ | ताळेबंदाशी संबंधित अनुसूची | ४३ |

| | | |
|---|---|---|
| **संचालक मंडळ** | श्री. दिनेशकुमार जैन, भाप्रसे, | अध्यक्ष |
| | श्री. अरुण बी. उन्हाळे, भाप्रसे, व्यवस्थापकीय | संचालक |
| | श्री. विकास व्ही. देशमुख, भाप्रसे, | संचालक |
| | श्री. संजय शामराव धोत्रे (खासदार) | संचालक |
| | श्री. वल्लभराव तेजराव देशमुख | संचालक |
| | श्री. विनोद के. गौर | संचालक |
| | श्री. संजय बी. खताळ | संचालक, |
| | श्री. संजय के. मेहता | संचालक |
| | श्री. मनमोहन एम. शर्मा | संचालक |

| | |
|---|---|
| **लेखा परिक्षक** | मे. रतन राठी ॲन्ड कंपनी, सनदी लेखापाल, खामगांव जि. बुलढाणा |
| | राम ठक्कर ॲन्ड असोशिएटस्, सेक्रेटेरियल ऑडिटर, अकोला |
| **बँकर्स** | बँक ऑफ महाराष्ट्र |
| **पंजीकृत कार्यालय** | 'महाबीज भवन', कृषिनगर, अकोला. |

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अधिकारी** | श्री. व्ही. एच. काळबांडे | मुख्य महाव्यवस्थापक (प्रक्रिया) |
| | श्री. अशोक एम. अमानकर | महाव्यवस्थापक (प्रशासन) |
| | श्री. एस. एम. पुंडकर | महाव्यवस्थापक (उत्पादन) |
| | श्री. संजय ठकरार | महाव्यवस्थापक(वित्त) |
| | श्री. आर. जी. नाके | महाव्यवस्थापक (विपणन) |
| | श्री. विनय एच. वर्मा | कंपनी सचिव तथा उप महाव्यवस्थापक (अंकेक्षण) |
| | श्री. यु. वाय. गावंडे | विभागीय व्यवस्थापक (गुणवत्ता नियत्रंण) |

# महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

**नोंदणीकृत कार्यालय, ''महाबीज भवन'' कृषि नगर,**
**अकोला-४४४ १०४**
**(कंपनी कायदा १९५६ नुसार पंजीकृत संस्था)**

CIN No. U01200MH1976SGC018990

## आमसभेची सूचना

(केवळ महाबीज भागधारकांसाठी)

प्रती,
सर्व सन्माननीय भागधारक,

महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या भागधारकांची ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा डॉ. पंजाबराव देशमुख कृषि महाविद्यालय, कृषिनगर, अकोला ४४४१०४ येथील डॉ. के.आर.ठाकरे सभागृहात,गुरूवार दिनांक ३१ डिसेंबर २०१५ रोजी दुपारी १.०० वाजता पुढील कार्यवाही पूर्ण करण्यासाठी भरविण्यात येत आहे. सर्व भागधारकांना आमसभेला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

### सामान्य कार्यवाही

१) महामंडळाचे दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता तयार केलेल्या नफातोटा पत्रक व त्या तारखेपर्यंतची स्थिती दर्शविणारे ताळेबंद व त्यावरील संचालकांचे अहवाल आणि लेखा परिक्षकांचे अभिप्राय यावर विचार करणे आणि त्यास मान्यता देणे.

२) महामंडळाचे दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी संपणाऱ्या वर्षाकरीता असलेल्या तथा दि. २६ सप्टेंबर २०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या १८० व्या सभेत महामंडळाच्या भागधारकांसाठी शिफारस केलेला १०% लाभांश देण्यासंबधी विचार करणे व त्यास मान्यता देणे.

### विशेष कार्यवाही

पुढील ठराव विशेष ठराव म्हणून संमत करणे-

३) या सभेस महामंडळाच्या रिक्त असलेल्या संचालकपदी, राष्ट्रीय बिज निगम, नवी दिल्लीद्वारे श्री संजय के. मेहता यांची संचालक म्हणून नियुक्ती करणे

संचालक मंडळाच्या आदेशानुसार

(विनय एच.वर्मा)
कंपनी सचिव
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या.अकोला

दिनांक-३-१२-२०१५

टिप :

१) ज्यांना सभेत उपस्थित राहण्याची व तेथे मतदान करण्याची अर्हता असेल अशा भागधारकांना प्रतिनिधीमार्फत सभेत उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क आहे. प्रतिनिधी हा महामंडळाचा भागधारक असणे आवश्यक नाही.

२) मात्र सन्माननीय भागधारकांनी नेमलेल्या प्रतिनिधींना, आमसभेत होणाऱ्या कार्यवाही संबंधीत ठरावांबाबत जर मतदान झाल्यास फक्त मतदानातच भाग घेता येईल. परंतु सभेच्या चर्चेत प्रत्यक्ष सहभागी होण्याचा अधिकार राहणार नाही अथवा सभास्थानी मंचावर येऊन कसल्याही प्रकारचा मुद्दा उपस्थित करता येणार नाही.

३) वार्षिक अहवाल स्वतंत्ररित्या भागधारकांच्या अधिकृत पत्त्यावर पाठविण्यात आलेले आहे. अहवालासोबत प्रतिनिधी नेमावयाचा सर्वसाधारण फॉर्म जोडलेला आहे. प्रतिनिधीत्वाचा फॉर्म, वैध ठरविण्यासाठी त्यावर एक रूपया इतक्या किंमतीचे रेव्हेन्यु स्टॅम्प लावुन त्यावर भागधारकाची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे. असे फॉर्म महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालय, महाबीज भवन कृषि नगर, अकोला ४४४ १०४ येथे सभेच्या वेळेच्या ४८ तासांपूर्वी पोहचणे आवश्यक आहे.

४) सभासदांच्या सोयीकरीता अहवालासोबत उपस्थिती पत्रिका संलग्न केली आहे. सभासद / प्रतिनिधींना विनंती करण्यात येते की, उपस्थिती पत्रिकेवर स्वाक्षरी करून सभेच्या ठिकाणी जमा करावी.

५) महामंडळाच्या आमसभेत घोषित केलेले लाभांश सन २००९-१० ,सन २०१०-२०११, सन २०११-२०१२, २०१२-२०१३ आणि २०१३-२०१४ या पाच वर्षाचे अनक्लेम आहेत. भागधारकांना पुनश्च विनंती की, मुदत संपल्याने स्वत:जवळच राहीलेल्या लाभांश वारंटस्‌ची मुदत वाढवून देण्यासाठी कंपनी सचिव यांचे कार्यालयात, महाबीज भवन कृषिनगर, अकोला या पत्त्यावर संपर्क साधावा. कारण घोषित केलेल्या वर्षापासून ७ वर्षाच्या आत जर भागधारकांनी लाभांश वॉरंटस्‌ वटविले नाही तर, कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२४ नुसार इन्व्हेस्टर एज्युकेशन आणि प्रोटेक्शन फंडमध्ये हस्तांतरीत करण्यात येईल व त्यानंतर हस्तांतरीत केलेल्या रकमेवर अथवा महामंडळावर कुठलाही हक्क राहणार नाही.

६) भागधारकांना विनंती की, त्यांनी आपल्या पत्त्यातील बदल महामंडळास त्वरीत कळवावा.

७) सभासदांना / सभासदांनी नियुक्त केलेल्या प्रतिनिधींना विनंती करण्यात येते की, वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहतांना वार्षिक अहवाल सोबत आणावा.

८) सभासदास नामनिर्देशन करावयाचे असल्यास अहवालासोबत नामनिर्देशनाचा फॉर्म संलग्न केला असून या सुविधेचा लाभ घ्यावा. सदर फॉर्म पुर्ण माहिती भरून व स्वाक्षरी केल्यानंतर महामंडळाच्या नोंदणीकृत कार्यालयात महाबीज भवन, कृषिनगर, अकोला येथे पाठविणे आवश्यक आहे.

९) कंपनी कायदा मंत्रालयाच्या हरित पुढाकार योजने अंतर्गत भागधारकास ई-मेल सुविधेप्रमाणे अहवाल प्राप्त करुन घेता येईल. सदर भागधारकांनी त्यांचा ई-मेल आयडी कंपनी सचिव कार्यालयास hocs@mahabeej.com या ई-मेल आयडीवर कळविण्यात यावा.

१०) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०२ (१)नुसार विशेष ठरावाबाबत स्पष्टीकरणात्मक टिपणी सोबत जोडण्यात येत आहे.

११) भागधारकांनी त्यांचे बँक खाते क्रमांकाची माहिती भरून दयावयाचा अर्ज, सोबत जोडला आहे.

१२) मृतक भागधारकांच्या वारसदारांना विनंती करण्यात येते की, समभाग संक्रमणाची प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी जेणेकरुन त्यांना सभेकरीता हजर राहता येईल.

१३) भागधारक/भागधारक प्रतिनिधी यांनी स्वत:चे सोईप्रमाणे सभेला हजर रहावे.

१४) मिटींगच्या ठरलेल्या वेळेनंतर मिटींग हॉलमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.

१५) नोंदणीचा कालावधी सभेच्या दिवशी सकाळी ९.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील.

****

**कंपनी कायदा २०१३ कलम १०२ अन्वये द्यावयाची स्पष्टीकरणात्मक टिपणी :-**

संचालक नियुक्तीचे नियम क्र.१२५ (अ) बाबत सविस्तर खालील प्रमाणे आहे :-

नियम क्र.१२५ (अ) कंपनीच्या संचालकवर्गापैकी दोन तृतीयांश संचालक वर्ग, प्रमाणशिर प्रतिनिधीत्वाच्या तत्वावर नियुक्त करण्यात येईल मग अशी नियुक्ती एकल हस्तांतरीणीय मताद्वारे (Single transferable vote) असो अथवा संचयी मतदान (cumulative vote) पध्दतीने असो अथवा संचालक मंडळ ठरवील अशा अन्य कोणत्याही पध्दतीने असो मात्र, संचालक मंडळाने अशी नियुक्ती एकल हस्तांतरणीय मताद्वारे (Single transferable vote) करण्याऐवजी अन्यप्रकारे करण्याचे ठरवले तर अशा निर्णयासाठी सर्वसाधारण सभेमध्ये कंपनीची मंजुरी घ्यावी लागेल.

वरील नियम, राष्ट्रीय बिज निगम, नवी दिल्ली यांनी केलेल्या नामनिर्देनिशानुसार आणि संचालक मंडळाच्या दि.२६ सप्टेंबर २०१५ रोजीच्या बैठकीमधील निर्णयानुसार श्री.संजय के.मेहता उपमहाव्यवस्थापक (लेखा) व विभागीय व्यवस्थापक एन.एस.सी पुणे यांची महाबीज संचालक मंडळावर संचालक म्हणुन नियुक्तीचा विशेष ठराव मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

सदर प्रस्ताव सादर करण्यामध्ये संचालक मंडळापैकी कोणत्याही संचालकाचा तसेच व्यवस्थापनातील व्यक्तीचा व त्यांच्या नातेवाईकांचा वैयक्तिक तथा आर्थिक किंवा इतर लाभाचा उद्‌देश नाही.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
स्वाक्षरांकीत
(विनय एच.वर्मा)
कंपनी सचिव
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या.अकोला

दिनांक-३-१२-२०१५

# संचालकांचा अहवाल

प्रति,
सर्व सन्माननीय भागधारक,

महामंडळाचा ३८ वा वार्षिक अहवाल दि. ३१ मार्च २०१५ रोजीची स्थिती दर्शविणारे अंकेक्षीत लेखे आपणासमोर ठेवण्यास आनंद होत आहे.

१) वित्तीय उपलब्धी :

| विवरण | ३१/३/२०१५ (रूपयामध्ये) | ३१/३/२०१४ (रूपयामध्ये) |
|---|---|---|
| एकुण उत्पन्न | ४४५४०३४०४२ | ६२१६२६६२५१ |
| वार्षिक घसारा व इतर खर्च | ४०११११३१९२ | ५६०४७७३२२६ |
| घसारा आणि कर्जफेडीनंतर निव्वळ नफा | ४४२९२०८५० | ६११४९३०२५ |
| अपवादात्मक सूची - | - | |
| विशेष सूची आणि कराआधी नफा | ४४२९२०८५० | ६११४९३०२५ |
| विशेष सूची | | |
| कराआधी नफा (कर पुर्व नफा) | | |
| चालू कर खर्च | (१५५००००००) | (२०८००००००) |
| कर स्थगित खर्च | (११३८११) | (२२०७१०५) |
| पुढे कालावधीतील नफा/(तोटा) | (१३०३१२८८) | (२०५९७०) |
| नफा/तोटा हस्तांतरणसमायोजीत सामान्य संचिती | २७५००३३७३ | ४०१०७९९५० |
| मुळ समभाग प्रतिभाग लाभ | ६८८ | ९६४ |
| प्रतिभाग लाभ | ६८८ | ९६४ |

**२) लांभाश**

संचालक मंडळाने निर्देश केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१४-१५ या वर्षासाठी १० टक्के दराने (रूपये १० प्रतीभाग) निव्वळ लांभाश देण्याकरिता रू ५०.०३ लक्ष रक्कमेचे विनियोजन करण्याचे वार्षिक सर्वसाधारण सभेत शिफारस करण्यात येईल.

**३) व्यापारी क्रिया व भविष्यातील शक्यता संभावनाचा आढावा.**

वर्षाच्या दरम्यान व्यापारी क्रिया व भविष्यासाठी केलेल्या क्रियाचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

**बिजोत्पादन :-**

महामंडळाने अहवाल वर्षात बिजोत्पादक तसेच तालुका बिज गुणण प्रक्षेत्र हयांचे माध्यमातुन प्रमाणित तथा सत्यप्रत दर्जाचे ८,०४,२९७ क्विंटल बियाणे आणि ७८,०९४ क्विंटल पायाभुत बियाणे उत्पादित केलेले असुन, त्यामध्ये भाजीपाला बियाण्याचा समावेश आहे. हया करिता अनुक्रमे एकुण ७३,५५८ हेक्टर व ७,४४९ हेक्टर क्षेत्र प्रमाणित व पायाभुत बिजोत्पादनाकरिता आयोजीत करण्यात आले होते. एकुण प्रमाणित बियाण्यामध्ये तृण धान्य २,४३,५९२ क्विंटल, कडधान्य १,२८,९५४ क्विंटल, तेलबिया ४,०१,९७६ क्विंटल, कापुस व इतर ५८७५ क्विंटल, हिरवळीचे १०,८८६ क्विंटल, व चारावर्गीय १०,९६४ क्विंटल, तसेच भाजीपाला २,०५० क्विंटल बियाणे मात्रेचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने ऊत्ती संवर्धीत तंत्राव्दारे केळीची रोपे व संकरीत पपईची रोपे तयार करुन शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहेत. सलग क्षेत्रावर बिजोत्पादन कार्यक्रम आयोजीत करण्याकरीता बिजोत्पादकांना प्रोत्साहीत करण्याचे दृष्टीने महामंडळाने तपासणी फी मध्ये १०० टक्के, ७५ टक्के व ५० टक्के सुट बिजोत्पादकांना 'ग्राम बिजोत्पादन योजने अंतर्गत देण्यात येते. हया योजनेमुळे बिजोत्पादकांना चांगला लाभ मिळाला असुन, या योजनेस ऊस्फुर्त प्रतिसाद मिळालेला आहे.

त्याचप्रमाणे महामंडळाने 'महाबीज बिजोत्पादन ग्राम पुरस्कार योजना' जाहीर केली असुन त्या अंतर्गत ज्या गावात ३००० क्विंटल पेक्षा जास्त प्रमाणित बियाणे उत्पादन घेणाऱ्या गांवाचा सुध्दा महाबीज मार्फत पुरस्कार देउन गौरव करण्यात आला. उच्चत्तम गुणवत्तेचे बियाणे उत्पादीत करण्याचे उद्देशाने बिजोत्पादकांना जाहीर करण्यात आलेल्या अतिरीक्त बियाणे गुणवत्ता प्रोत्साहन रकमेमुळे महामंडळास सोयाबीन, तुर, उडीद, मुग व धान इत्यादी पीकामध्ये उच्चत्तम उगवणशक्तीचे बियाणे उत्पादन करणे शक्य झालेले आहे. त्याच प्रमाणे उपरोक्त योजनेअंर्तगत बिजोत्पादकांनी कमी निम्मस्तर असलेले कच्चे बियाणे महाबीजला हस्तांतरीत केल्यामुळे प्रक्रीया खर्चामध्ये बचत होउन उच्चत्तम गुणवत्तेची बियाणे मात्रेमध्ये वाढ झालेली आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियाना अंर्तगत कडधान्य व तृण धान्य पिकवाणाच्या बियाण्याची मागणी लक्षात घेता महामंडळाने कडधान्य पिकामध्ये हरभरा व उडीद वाणाचे व तृण धान्य पिकामध्ये रबीज्वार व धान पिकवाणाचे विक्रमी उत्पादन करुन बियाणे वितरीत करण्यात आले. त्यामुळे सदर पिकामध्ये धान व रबीज्वार बियाणे बदलाचे प्रमाणामध्ये वाढ होण्यास मदत झाली तसेच महामंडळाने गळीत, कडधान्य व तृण धान्य पिकामध्ये नवीन वाणाचे बियाणे उत्पादीत करुन राज्यातील शेतकऱ्यामध्ये प्रसार होण्याकरिता उपलब्ध करुन दिले.

**बिजोत्पादनात नवीन वाणाचा समावेश**

महामंडळाने अहवाल वर्षात सुधारीत बाजरी धनशक्ती, भात आरटीएन-५, कर्जत-८, संकरित भात सहयाद्री-३, सहयाद्री-४, तुर पिकेव्ही तारा विपुला, बीडीएन-७११, मुग बीएम-२००३-२, सोयाबीन एमएयुएस-१६२, एमएसीएस-११८८, फुले अग्रणी, एमएयुएस-१५८, जेएस-९५-६०, तीळ जेएलटी-४०८, गहु फुले समाधान, एमअेसीएस-६२२२, एमअेसीएस-६४७८, एचआय-८६६३(पोषण), नेत्रावती, पिकेव्ही वाशीम-१४७२, एकेडब्लु-४६२७, रब्बी ज्वार परभणी मोती, परभणी ज्योती, फुले वसुधा, फुले रेवती, फुले अनुराधा, फुले सुचित्रा, करडई पीबीएनएस-१२, एकेएस-२०७ आणि हरभरा जाकी-९२१८, दिग्वीजय, आकाश, पिकेव्ही काबुली-४, कृपा इत्यादी कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या नवीन वाणांचा बिजोत्पादनामध्ये समावेश केलेला आहे.

**बिज प्रक्रिया**

मोठ्या प्रमाणात कच्चे बियाणेची प्रक्रिया करून चांगल्या प्रतिचे बियाणे विपणनाकरीता योग्य वेळी उपलब्ध करून देणे नेहमीच एक मोठे आव्हान महाबीज करीता राहत आलेले आहे. अहवाल वर्षामध्ये एकंदरीत ११,१४,१८५ क्विंटल कच्चे

बियाण्यावर खरीप, रब्बी तथा उन्हाळी हंगामामध्ये वेळेच्या आत प्रक्रिया करून उच्च प्रतिचे बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

अहवाल वर्षामध्ये महाराष्ट्र शासनाने, केंद्र शासन पुरुस्कृत '' राष्ट्रीय कृषी विकास योजना'' अंतर्गत एकंदरीत ९.९८ कोटी रूपयाचा निधी महाबीजला प्रदान केला. अहवाल वर्षामध्ये महाबीजने आष्टा ( जि सांगली ) सातपुर जि. (नाशिक ) व पाचोरा (जि. जळगाव ) येथील गोदाम व कार्यालयाची इमारत बांधकाम पुर्ण केले असुन, लातुर, हिंगोली, परभणी, अकोट जि. (अकोला), चिखली जि.( बुलढाणा), खामगाव जि. ( बुलढाणा) वाशिम व दर्यापुर जि. ( अमरावती ) येथील काम प्रगतीपथावर असुन गोदाम बांधकाम तथा कार्यालयाची इमारत अंतर्गत १,०८,००० क्विंटल बियाणे क्षमता निर्माण केली. नविन बिज प्रक्रिया केंद्र लातुर व हिंगोली येथील प्रक्रिया केंद्राची इमारत व गोडाउन बांधकाम पुर्णत्वाकडे असुन नविन बिज प्रक्रिया केंद्र नोव्हेंबर २०१५ मध्ये सुरू होईल. हया अंतर्गत हिंगोली, लातुर, बुलढाणा, सांगली, नाशिक, जळगाव, अकोला, वाशिम, अमरावती तथा परभणी जिल्हयातील उत्पादीत बियाणे साठवणुकीची सोय झाली.

बिज प्रक्रिया केंद्र शिवणी, तपोवन, जालना, मलकापुर, वाशिम, यवतमाळ, एरंडोल, खंडाळा ,ढोकी तथा हिंगोली इत्यादी प्रक्रिया केंद्रावरील जुनी यंत्रे बदलवुन अद्ययावत यंत्रे बसविण्यात आली. जसे बियाणे सफाई तथा प्रतवारी यंत्र, ग्रॅव्हीटी सेपरेटर, बियाण्यास औषधी लावणार ट्रिटर यंत्र, बियाणे संवेष्ठन यंत्र तथा बियाणे हाताळणी मशिन इ. मशिनरी राष्ट्रीय कृषी विकास योजना'' अंतर्गत प्राप्त निधीमधुन विकत घेऊन बदलविण्यात आली आहे.

खरीप व रब्बी हंगामातील कच्चे बियाण्याची प्रक्रिया नवीन बसविलेल्या यंत्रांवर करण्यात आली. महाबीजच्या अभियंत्यानी आपल्या अनुभवातुन खुप साऱ्या नविन कल्पना तथा कार्यप्रणाली अंमलात आणुन तथा काही कामाचे यांत्रीकीकरण केले. महाबीजने बियाणे पिशव्यांमध्ये भरणे, लेबल छपाई, कन्व्हेअर, फोर्क लिफ्टर यंत्र इत्यादी चा पुरवठा जास्तीत जास्त प्रक्रिया केंद्रावर केलेला आहे. जेणेकरून प्रक्रिया कामामध्ये (ऑपरेशन) सुलभीकरण होईल व मजुरांच्या कमतरतेचा प्रश्न सुटेल. यामुळे प्रक्रिया खर्चामध्ये कपात शक्य झाली. बिजोत्पादक शेतकऱ्यांचे बियाणे वर प्रक्रिया तथा साठवणुक शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्या जावुन दर्जेदार बियाण्याची निर्मिती करण्यास मदत झाली.

महाबीजची स्वत:च्या गोदामध्ये बियाणे साठवणुकीची क्षमता ७,३२,५०० क्विंटल एवढी आहे. तर बियाणे प्रक्रिया क्षमता वाढुन एकुण ११,८९,५०० क्विंटल एवढी झालेली आहे. त्यामुळे त्या त्या जिल्हयामध्ये निर्मीत बियाण्यावर त्या त्या जिल्हयातील महाबीज च्या स्वत:च्या प्रक्रिया केंद्रावर, प्रक्रिया करण्यासह, महाबीजच्या गोडाउन मध्येच बियाणे साठविणे शक्य झाले.

अहवाल वर्षामध्ये महाबीजने अर्थसंकल्पीय नियंत्रण पद्धत यशस्वीरीत्या राबवून प्रक्रिया खर्चामध्ये कपात शक्य केली तथा बाजारामध्ये इतर बियाणे उत्पादक कंपन्यांशी स्पर्धा करणे शक्य झाले. तसेच महाबीजच्या अनुभवी व उच्च शिक्षीत अभियंत्यानी स्वबळावर तांत्रिक सल्लागार म्हणुन जि. एस. एस. सि. एल, प्रायव्हेट सिड कंपनीची व इतर राज्यातील महामंडळाचे काम करून महाबीजला उत्पन्न व नाव मिळवून दिले.

**बियाणे विपणन:**

खरीप २०१४ हंगामात महामंडळाने एकुण २,५५,९३७ क्विंटल बियाणे विक्री केले आहे. सदर विक्री एकुण बियाणे उपलब्धतेच्या ८७ टक्के आहे. रब्बी २०१४ हंगामात २,३२,३१९ क्विंटल बियाणे विक्री केले आहे. उन्हाळी हंगामात २५,५३१ क्विंटल बियाणे विक्री केले आहे. त्याच प्रमाणे वर्ष २०१४-१५ मध्ये १,०३,१३१ क्विंटल भाजीपाला, चारा बियाणे व हिरवळीचे खत बियाणे विक्री केले आहे. त्याची किंमत ६६.७६ कोटी रूपये होते. हया पैकी ८५,५०० क्विंटल चारा पिकाचे बियाणे वैरण विकास कार्यक्रमांतर्गत शासनास पुरवठा करण्यात आले आहे. महामंडळाद्वारे योग्य नियोजन, वेळेवर बियाणे उपलब्धता व रास्त दर हयामुळे मोठ्या प्रमाणावर विक्री साध्य केली आहे.

भारत सरकारचे राष्ट्रीय अन्न सुरक्षा मोहिमेअंतर्गत महामंडळाने भात, गहू व कडधान्य हया पिकाचे निवडक जिल्हयामध्ये बियाणे पुरवठा केला आहे. तसेच खरीप २०१४ हंगामामध्ये सुध्दा सदर योजने अंतर्गत ८६८३ क्विंटल भात, तुर, मुंग व उडीद व रब्बी २०१४ हंगामात २,१०,७९० क्विंटल हरभरा व गहू बियाणे पुरवठा केलेला आहे. भरडधान्य योजने अंतर्गत खरीप २०१४ हंगामात ६१७ क्विंटल व रब्बी २०१४ हंगामात ४६७९ क्विंटल ज्वारी बियाण्याचा पुरवठा केला आहे.

**गुणवत्ता नियंत्रण :**

सोयाबीन बियाणे तक्रारीस आळा बसण्याचे दृष्टीकोनातून उन्हाळी २०१२ हंगामापासुन सोयाबिन बियाण्याची क्षेत्रीय उगवण चाचणी घेण्यात येत आहे. याशिवाय या वर्षी स्क्रीन साईज ९x६४ ऐवजी ८x६४ करण्यात आलेला असून बियाण्यांच्या उगवणीबाबत कोणतीही तक्रार महामंडळाला प्राप्त झालेली नाही.

**४) साहित्य बदल व कंपनीच्या आर्थिक स्थितीवर प्रभाव पाडणारे घटक व बांधिलकी.**

कंपनीच्या आर्थिक स्थितीवर प्रभाव पाडणारे कोणतेही विशेष बदल या वर्षात घडून आलेले नाही.

**५) उर्जा संवर्धन, तंत्रज्ञान उपयोग, परकीय चलन कमाई व खर्च.**

उर्जा संवर्धन, तंत्रज्ञान उपयोग, परकीय चलन कमाई व खर्च संबधित माहिती कंपनी अधिनियम कलम १३४ (३)(म) नूसार कंपनी कायदा २०१३ अंतर्गत व कंपनी (खाते) नियम २०१४ च्या नियम ८(३) अंतर्गत खालील प्रमाणे दिले आहे.

**उर्जा संवर्धन**

संचालक मंडळ नेहमी उर्जेचे संवर्धन करण्यासाठी सर्व प्रयत्न करते. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ नैसगिक उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकिया केद्राच्या ठिकाणी एलइडी दिवे व सौर उर्जेचा वापर करीत आहे. कंपनी बिज प्रकिया करण्याच्या नविन यांत्रिकीकरण आणि निरक्षणाचा अभ्यास करून उर्जा बचत करण्याकरिता प्रयत्नशिल आहे.

**नविन प्रकिया तंत्रज्ञानाचा अनुकूल समावेश.**

महामंडळाने वेळोवेळी संशोधन व विकास विभागा अंतर्गत विपणनाच्या आवश्यकतेनुसार उच्चतम बियाण्याची निर्मीती केली आहे. त्यामध्ये संकरित कापूस, अन्नधान्य पिके, डाळी आणि भाजीपाला बियाण्याचा समावेश आहे. सध्या आम्ही स्वत:चे बी.टी. कापूस बियाणे विकसित करण्यासाठी प्रगत टप्यावर आहोत.

**विदेशी मुद्रा विनिमय**

१) विदेशी मुद्रा प्राप्ती रू. शुन्य

२) विदेशी मुद्रा खर्च रू. १६.०२ लाख

**६) कंपनीच्या जोखीम व्यवस्थापन धोरण विकास आणि अंमलबजावणी विषयी निवेदन.**

कंपनीचा जोखीम हा घटक फार कमी आहे. म्हणून कंपनीत कोणत्याही जोखीम व्यवस्थापनाचे धोरण नाही.

**७) सामुदायीक सामाजीक जबाबदारीच्या मुददयाच्या अमलंबजावणीवर कंपनीच्या प्रगतशील धोरणाचा तपशील.**

कंपनी प्रभावीपणे सीएसआर उपक्रम अंमलबजावणीसाठी पुढाकार घेत आहे. आणि सामुदायीक सामाजीक जबाबदारीसाठी धोरण विकसित केलेले आहे.

**८) कर्ज, हमी किंवा गुंतवणुकीचे कंपनी कायदा २०१३ कलम १८६नुसार विवरण.**

कलम १८६ अंतर्गत केलेले कर्ज हमी किंवा गुंतवणूकीचे विवरणा आधीच आर्थिक अहवालामध्ये नोदवले आहे.

**९) संबधित व्यक्तीनी केलेले करार किंवा ठराव याचा तपशील**

कलम १८८ संबधित व्यक्तीनी केलेले करार किंवा ठराव याचा तपशील आधिच आर्थिक अहवालात दिलेला आहे.

**१०) वैधानिक लेखा पात्रता आरक्षण याबददल स्पष्टीकरणे.**

वैधानिक लेखा पात्रता आरक्षण आणि सराव कंपनी सचीव स्पष्टीकरण आणि टिपण्या परिशिष्ट १ मध्ये दिली आहे.

**११) संचालक नियुक्ती त्याचे मानधन व कर्तव्याबाबत कंपनीचे धोरण**

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १७८ (१) च्या तरतुदी नुसार नामनिर्देशन आणि वेतन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. केद्र सरकारच्या भारतीय सामुहीक उद्योग मंत्रालयाचे दिनांक ५ जून २०१५ च्या सुचनेनुसार वरिष्ठ व्यवस्थापन आणि इतर कर्मचारी याची नियुक्ती वगळता कंपनी कायदा २०१३ कलम १७८ (२) (३) (४) च्या अटीतून सरकारी कंपन्याना सुट देण्यात आली आहे. या समितीमध्ये एक स्वंतत्र संचालक असणे आवश्यक असुन संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर व्यवस्थापन व वेतन समिती कार्यान्वित होणार या नियुक्ती संबधित सुचना राज्य शासनाला त्यांचे मत घेण्याकरिता सादर करण्यात आली आहे.

**१२) वार्षिक विवरण**

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम २०१४ च्या नियम १२ कलम ९२ च्या तरतुदीच्या अनुषगाने वार्षिक विवरण अहवाल परिशिष्ट २ मध्ये संलग्न आहे.

**१३) बोर्डाची माहिती व सभेचा आढावा**

आढावा वर्षात आयोजित बोर्ड सभा संख्या बोर्ड आणि संचालक मंडळ समितीच्या बैठकीचा तपशील अहवाल परिशिष्ट ३ मध्ये संलग्न आहे.

**१४) संचालकांचे जबाबदारीबाबत निवेदन.**

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४(५) उपबंधानुसार आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी संचालकाचे जबाबदारीबाबतचे निवेदन सादर करीत आहे.

(अ) वार्षिक लेखे तयार करतांना लेख्यांबाबत लागु असलेली मापदंडे अवलंबिलेली आहेत. ज्या बाबीबाबत लेखा नियमांपासुन वेगळी पध्दत अवलंबिली आहे, अशा बाबीं बाबत योग्य स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

(ब) संचालक मंडळाने अशा प्रकारच्या लेखांकनाच्या पध्दतीचे अनुसरुण केले आहे, ज्यात समन्वयता व संभाव्यता हयांचा मेळ लागेल, व त्या बाबत सर्वकष अशी सातत्याने पाठाखण केली आहे, की ज्याद्वारे

महामंडळाच्या कामकाजाबाबत तथा आर्थिक वर्षाशी संबंधीत, नफा तोटा, पत्रक हे खरे व वस्तुनिष्ठ स्वरुप प्रगट करेल.

(क) संचालकानी कंपनी कायद्या अंतर्गत आवश्यक असलेले लेखे ठेवण्याबाबत काळजी घेतली आहे, जेणे करुन महामंडळाची मालमत्ता सुरक्षीत राहील तथा अपहार, अनियमीतता होणार नाही व झाल्यास उघडकीस येईल.

(ड) संचालकांनी वार्षिक लेखे प्रचलीत पध्दतीनुसार तयार केले आहेत.

(इ) संचालकाना सर्व कायदे व तरतुदी नुसार अशा प्रणाल्यावर पुरेशी आणि प्रभावीपणे कार्य होते याची खात्री करण्यासाठी योग्य प्रणाली कार्यान्वित्त केली आहे.

**१५) दुय्यम संयुक्त आणि सहाय्यक कंपनी**

कंपनीच्या सहाय्यक असलेल्या राष्ट्रीय कंपनी बियाणे महामंडळ हे एकूण भांडवलाच्या ३५.४४ भाग धारण करत आहे.

**१६) ठेवी**

या वर्षात कंपनीने कोणत्याही ठेवी स्विकारल्या किंवा ठेवीचे नुतनीकरण केले नाही.

**१७) स्वंतत्र संचालकांची घोषणा**

मंडळावर कोणतेही स्वंतत्र संचालक नसल्यामुळे ते सादर करण्यात आले नाही.

**१८) लेखापरीक्षा समिती.**

संचालक मंडळाने कंपनी कायदा २०१३ च्या कलम १७७ च्या तरतुदीनुसार लेखापरीक्षा समितीच्या रचनेला मान्यता दिली आहे. या समितीमध्ये स्वंतत्र्य संचालक असणे आवश्यक असुन संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर लेखापरीक्षा समिती कार्यान्वित होणार. या नियुक्ती संबधीची सुचना राज्य शासनाला त्यांचे मत घेण्या करिता सादर करण्यात आली आहे.

**१९) समभाग**

**समभाग परत खरेदी करणे**

कंपनीने आढावा वर्षात कोणतेही समभाग विकत घेतले नाही.

**सामान्य समभाग**

कंपनीने आढावा वर्षात कोणतेही सामान्य समभाग वाटप केले नाही.

**बोनस समभाग**

आढावा वर्षात कोणतेही बोनस समभाग वाटप केले नाही.

**कर्मचारी समभाग पर्याय योजना**

कर्मचारीसाठी कोणतेही समभाग पर्याय योजना प्रदान केली नाही.

**२०) महिला लैगिक छळ (प्रतिबंध बंदी आणि तक्रार निवारण) कायदा २०१३ अंतर्गत प्रगटीकरण**

चालू आढावा वर्षात कलम २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिला लैगिक छळ (प्रतिबंध बंदी आणि तक्रार निवारण) या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

**कृतज्ञता -**

अहवाल वर्षातील उपलब्धी ही महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी हयांच्या प्रामाणिक व सर्वकष प्रयत्नांचे फळ आहे. हया व्यतिरीक्त खालील संस्था व कंपनी प्रती मी कृतज्ञता व्यक्त करीत आहे.

- केंद्र शासन, महाराष्ट्र राज्य शासन हयांच्या सातत्याने असणाऱ्या पाठींबा व मार्गदर्शना बाबत
- राज्य बिज प्रमाणिकरण संस्था,
- राष्ट्रीय बिज निगम व अन्य बिज निगम तसेच देशातील सर्व कृषि विद्यापिठे.
- 'आयसीएआर' व 'ईक्रिसॅट' हयांच्या बहूमोल पाठिंब्याबाबत
- माझे गत व वर्तमान संचालक मंडळावरील सहयोगी यांनी दिलेल्या पाठींब्या बाबत तथा मार्गदर्शना बाबत
- बँक ऑफ महाराष्ट्र व अन्य बँकर्स, अंकेक्षक, वकील त्यांनी दिलेल्या कार्यक्षम सेवांबाबत
- जे, सातत्याने आमच्या शक्तीचे स्तोत्र राहीले आहेत असे बिजोत्पादक, बियाणे विक्रेते आमच्या बियाण्याच्या मार्काचे प्रस्तुतकर्ते व आश्रयदाते (ह्या सर्वांचे)
- भागधारकांच्याप्रति त्यांनी सातत्याने देऊ केलेल्या विश्वास व पाठीब्यांबाबत

संचालक मंडळाच्यावतीने व करीता

स्थान- अकोला

(दिनेशकुमार जैन)
अध्यक्ष

दिनांक : २६/०९/२०१५

## परिशिष्ट १

## वैधानिक लेखापरीक्षक व सचिवालय लेखापरीक्षकाच्या अहवालाबाबत स्पष्टीकरण

### संचालक मंडळाच्या अहवालास पुरक परिशिष्ट
### वैधानिक लेखा अहवालावर भागधारकांना उत्तर
### आर्थिक वर्ष २०१४-१५

| निरिक्षण क्र. | उत्तर |
|---|---|
| १. | संचालक मंडळाने २०-०६-२०१५ च्या सभेमध्ये सीएसआर धोरण मंजूर केले आहे. म्हणून कंपनी आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये कंपनी कलम १३५(५) चे अनूपालन करणार आहे. |
| २. | महामंडळ नियमीतपणे देय असलेले वैधानीक कर सेवाकरासहीत भरणा करत आहे. मात्र सूचित केलेल्याप्रमाणे महामंडळ सेवा करासंबधीत देय व व्याप्ती याची तज्ञांकडून मत प्राप्त करेल. तसेच बियाणे उद्योगास लागू असलेल्या सूट याबद्ल सूध्दा मत प्राप्त करेल व त्याप्रमाणे योग्य तो बदल करण्यात येईल. |
| ३. | कंपनीने ने ग्रॅच्युइटी तसेच रजा रोखेकरणाची देयतेची तरतुद केली आहे. तसेच दर वर्षीप्रमाणे एल.आय.सी. कडुन प्रमाणपत्र प्राप्त करून त्याचे प्रकटीकरण केले आहे. प्रकटीकरणा मध्ये झालेल्या बदला बद्ल एल.आय.सी. कडे पाठपुरावा करून महामंडळ माहिती घेईल. |
| ४. | (ए.स.)लेखा मानंक २८ अन्वये स्थायी मालमत्तेचे परिक्षणा सबंधी लागू असलेल्या तरतूदीचा अभ्यास केला जाईल.. |
| ५. | अनुसुची - २३ मधिल टिपणी २(VII) चा खुलासा स्वंयस्पष्ट आहे. |
| मुद्दा क्रं ४ लेखा अहवाल परिशिष्ट | नोंद घेण्यात आली. अंतर्गत लेखा परीक्षण विभागाकडून उत्पादनसंबंधी कार्य, प्रक्रिया संबंधीची कार्य, नापास लोग्रेड आणि सांविधीक देय राशींचे शोधनाची बिले तपासणी योग्यत्या कालांतराने करण्यात येतात. अंतर्गत लेखा परिक्षण विभागाचे बळकटीकरण करण्याकरिताचे पाऊल उचलण्यात येत आहे. व यासाठी विभागात कर्मचाऱ्यांची भरती करण्याकरीता आवश्यक कार्यवाही होत आहे. |
| मुद्दा क्रं ७ लेखा अहवाल परिशिष्ट | अनुसुची - २५ मधिल टिपणी क्रं. III चा खुलासा स्वंयस्पष्ट आहे. |

दिनेशकुमार जैन भा.प्र.से.
अध्यक्ष

## परिशिष्ट २

### प्रपंत्र नं. ९
### वार्षिक अहवालाचे निष्कर्ष (उध्दरण)

### वार्षिक वर्ष समाप्त २०१५ रोजी
### महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित

(कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९२(३) च्या अनुंशगाने आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन ) २०१४ च्या नियम १२ (१) नूसार )

I) **नोंदणी आणि इतर तपशील**

| | |
|---|---|
| १) नोंदणी क्रं./संख्या | U01200MH1976SGC018990 |
| २) नोंदणी दिनांक | २८ एप्रिल १९७६ |
| ३) कंपनीचे नांव | महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित. |
| ४) कंपनीचा वर्ग/उपवर्ग | राज्य सरकार कंपनी |
| ५) नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व संपर्काचा तपशील | 'महाबीज' भवन कृषीनगर, अकोला ४४४ १०४ |
| ६) कंपनी सूचीबद्ध आहे का? | नाही |
| ७) हस्तांतरण मध्यस्थी असेल तर नोंदणीदाराचा नांव व पत्ताचा तपशील | लागू नाही |

II) कंपनीच्या मुख्य व्यवसायाचे उपक्रम

कंपनीची एकूण उलाढाल १० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक असलेल्या व्यवसायाबद्दल माहिती खालीलप्रमाणे आहे..

| अ.क्र. | मुख्य उत्पादनाचे/सेवाचे नांव व वर्णन | उत्पादने व सेवाच एनएसी सांकेतिक | कंपनीच्या एकुण उलाढालीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बियाणे उत्पादन आणि व्यापारापासून उत्पन्न | बियाणे उद्योग | १०० |

III) <u>दुय्यम व सहाय्यक सहकारी कंपनीधारकाचा तपशील</u>

| अ.क्र. | कंपनीचे नांव व पत्ता | सीआयएन | धारक/दुय्यम/सहाय्यक | समभागाची टक्केवारी | लागू अनूभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | राष्ट्रीय बियाणे महामंडळ | 074899DL1963PLC003913 | सहाय्यक | ३५.४४ | |

**IV) समभाग धारकाचे स्वरूप, कार्यप्रणाली, आकृती (एकूण सामान्य टक्केवारी म्हणजे सामान्य समभाग भांडवल)**

i) वर्गवारी समभाग धारक

| समभागधारकाचा वर्ग | वर्षाच्या सुरुवातीला असलेली समभागाची संख्या | | | | वर्षाच्या शेवटी असलेली समभागाची संख्या | | | | वर्षात बदलेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | त्रुटी | शारिरीक | एकूण | एकूण समभागाची टक्केवारी | त्रुटी | शारिरीक | एकूण | एकूण समभागाची टक्केवारी | |
| **अ)संस्थापक** | | | | | | | | | |
| **भारतीय** | | | | | | | | | |
| वैयक्तिक | - | ५३११२ | ५३११२ | १२.७० | - | ५३११२ | ५३११२ | १२.७० | लागू नाही |
| केंद्र सरकार | - | १४८३३० | १४८३३० | ३५.४४ | - | १४८३३० | १४८३३० | ३५.४४ | लागू नाही |
| राज्य सरकार | - | २०५०० | २०५०० | ४९.०० | - | २०५०० | २०५०० | ४९.०० | लागू नाही |
| संस्था महामंडळ | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| बँका/वित्तीय संस्था | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| इतर कोणतेही | - | ० | १२००३ | २.८६ | - | ० | १२००३ | २.८६ | लागू नाही |
| **एकूण(अ) (१)** | - | ० | ० | १०० | - | ० | ० | १०० | लागू नाही |
| **२) विदेशी** | | | | | | | | | |
| अनिवासी | | | | | | | | | |
| भारतीय व्यक्ती | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| इतर व्यक्ती | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| संस्थामहामंडळ | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| बँका/वित्तीय संस्था | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| इतर कोणतेही | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **एकूण(अ) (२)** | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **एकूण संस्थापक समभागधारक** | | | | | | | | | |
| (अ)=(अ)(१)+(अ)(२) | | | | १०० | | | | १०० | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ब)सार्वजनिक समभाग** | | | | | | | | | |
| १) संस्था | | | | | | | | | |
| परस्पर संचय | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| बॅका/वित्तीय संस्था | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| केंद्र सरकार | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| राज्य सरकार | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| उपक्रम भांडवल निधी | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| विमा कंपनी | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| विदेशी गुंतवणुकदार संस्था | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| विदेशी भांडवल उपक्रम निधी | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| इतर निर्देशित | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| एकूण (ब) (१) | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **२) गैर संस्था** | | | | | | | | | |
| **अ) संस्था महामंडळ** | | | | | | | | | |
| १)भारतीय | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| २)परदेशी | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **ब)वैयक्तीक** | | | | | | | | | |
| १)वैयक्तीक समभागधारकाला भागभांडवलाच्या नाममात्र १ लाख रू | - | - | - | १०० | - | - | - | १०० | लागू नाही |
| २)वैयक्तीक समभागधारकाला भागभांडवलाच्या अतिरिक्त १ लाख रू | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **क)इतर** | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| **एकूण (ब) (२)** | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| एकूण सार्वजनिक समभागधारक (ब)=(ब)(१)+(ब)(२) | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| जीडीआरएस व एडीआरएस समभागासाठी पालक आयोजित | - | ० | ० | ० | - | ० | ० | ० | लागू नाही |
| एकूण (अ)+ (ब) +(क) | - | - | - | १०० | - | - | - | १०० | |
| | | | | | | | | | |

ii) **संस्थापक समभागधारक**

| अ.क्र. | समभागधारकाचे नांव | वर्षाच्या सुरुवातीला समभागधारक | | | वर्षाच्या शेवटी समभागधारक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण समभाग | कंपनीच्या एकूण समभागाची टक्केवारी | एकूण समभागाच्या तरणाखालील समभागाची टक्केवारी | एकुण समभाग | कंपनीच्या एकूण समभागाची टक्केवारी | एकूण समभागाच्या तरणाखालील समभागाची टक्केवारी | वर्षात झालेल्या समभागाच्या बदलाची टक्केवारी |
| १ | महाराष्ट्र शासन | २०५००० | ४९.०० | लागू नाही | २०५००० | ४९.०० | लागू नाही | शून्य |
| २ | राष्ट्रीय बियाणे महामंडळ | १४८३३० | ३५.४४ | लागू नाही | १४८३३० | ३५.४४ | लागू नाही | शून्य |
| ३ | कृषि विद्यापिठ | १२००३ | २.८६ | लागू नाही | १२००३ | २.८६ | लागू नाही | शून्य |
| ४ | | ० | ० | लागू नाही | ० | ० | लागू नाही | शून्य |
| | एकूण | ० | ० | ० | ० | ० | ० | |

iii) **संस्थापक समभागधारका मध्ये बदल (कुपया बदल झालेला नाही तर निर्दिष्ट करा)**

| अ.क्र. | दिनांक | शेरा | समभागाची संख्या | वर्षा दरम्यान एकूण समभागधारक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | समभागाची एकूण संख्या | कंपनीच्या एकूण समभागाची टक्केवारी |
| शून्य | | | | | |

iv) **समभागधारकाच्या पहिल्या दहा समभागधारकाची कार्यप्रणाली (संस्थापक समभागाधारक संचालक व जीडीआरएस व एडीआरएस समभागधारकापेक्षा वेगळे)**

| अ.क्र. | दिनांक | शेरा | समभागाची संख्या | वर्षा दरम्यान एकूण समभागधारक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | समभागाची एकूण संख्या | कंपनीच्या एकूण समभागाची टक्केवारी |
| शून्य | | | | | |

v) **संचालक व व्यवस्थापनातील व्यक्ती यांनी धारण केलेले समभाग**

| अ.क्र. | नांव | समभागाची संख्या | वर्षा दरम्यान एकुण समभागधारक | |
|---|---|---|---|---|
| | | | समभागाची एकूण संख्या | कंपनीच्या एकुण समभागाची टक्केवारी |
| १. | श्री.संजय शामराव धोत्रे,संचालक | १५ | १५ | ०.००१ |
| २. | श्री. वल्लभराव तेजराव देशमुख, संचालक | ३ | ३ | ०.००१ |

V) **कर्जबाजारीपणा**

कंपनीच्या देयकात कर्जबाजारीपणा व त्यावरील व्याजाचा समावेश होता रक्कम न दिल्यामूळे ते वाढले.

| तपशील | ठेवी वगळून सुरक्षित कर्ज | असुरक्षित कर्ज | ठेवी | एकूण कर्जबाजारीपणा |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला कर्जबाजारीपणा<br>१ मुददलाची रक्कम<br>२ व्याज देय पण दिले नाही<br>३ व्याज जमा नाही | रू. निरंक<br>व्याजाचा समावेश | निरंक<br>व्याजाचा समावेश | | निरंक |
| एकूण | | | | |
| आर्थिक चालू वर्षात कर्जबाजारीपणात बदल व्यतिरीक्त कमी | निरंक | निरंक | | निरंक |
| आर्थिक वर्षाच्या शेवटी कर्जबाजारीपणा<br>१ मुददलाची रक्कम<br>२ व्याज देय पण दिले नाही<br>३ व्याज जमा नाही | निरंक | निरंक | | निरंक |
| एकूण (१ +२ +३) | निरंक | निरंक | | निरंक |

VI) <u>संचालक व व्यवस्थापनातील व्यक्तीच्या वेतनाबाबत</u>

**अ) व्यवस्थापकीय संचालक पुर्णवेळ संचालक आणि व्यवस्थापकाच्या वेतनाबाबत.**

| अ.क्र. | वेतनाबाबत तपशील | व्यवस्थापकीय संचालक/ पूर्णवेळ संचालक | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एकूण पगार<br>अ) आयकर कायदा १९६१ च्या पगार कलम १७(१) तरतूदीनूसार<br>ब) आयकर कायदा १९६१ कलम १७(२) नूसार महत्वाचे विशेषाधिकार<br>क) आयकर कायदा१९६१ अतर्गत कलम१७(३) नुसार पगाराऐवजी नफा | डॉ. एस. डी. वानखडे<br>श्री. ए. बी. उन्हाळे | रू. ८३७०००/-<br>रू. १५६०००/- |
| २ | सामान्य पर्याय | - | - |
| ३ | परीश्रमीक सामान्य | - | - |
| ४ | कमीशन दलाली जर नफ्याची टक्केवारी इतर निर्देशित | - | - |
| | एकूण(अ) | - | - |
| | कायदानूसार कमाल मर्यादा | - | - |

**ब) संचालकाच्या वेतनासंबधी**

| अ.क्र. | वेतनासंबधी तपशील | संचालकाचे नाव | | | | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वंतत्र संचालक<br>• ब्रोर्ड समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे शुल्क<br>• कमीशन दलाली भत्ता .<br>• इतर निर्देशित | शून्य | शून्य | शून्य | शून्य | शून्य | |
| | एकूण (१) | | | | | | 0 |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | इतर बिगर कार्यकारी संचालक<br>• बोर्ड समितीच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे शुल्क<br>• कमीशन दलाली भत्ता .<br>• इतर निर्देशित | श्री. संजय शा. धोत्रे<br>श्री व्ही. टी. देशमुख | ४०००<br>८००० |
| | एकूण (२) | | १२००० |
| | एकूण ब=(१+२) | | १२००० |
| | एकूण व्यवस्थापन वेतन | | |
| | कायदानूसार एकूण कमाल मर्यादा | | |

**क) व्यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापक/पूर्णवेळ संचालक व्यतिरीक्त व्यवस्थापनातील व्यक्तीच्या वेतनासंबधी**

| अ.क्र. | वेतनासंबधी तपशील | संचालकाचे नाव | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| | लागू नाही | लागू नाही | लागू नाही |

VII) **दंड/शिक्षा/संयोगिक गुन्हा**

| प्रकार | कंपनी कायदयाचे कलम | थोडक्यात वर्णन | दंड/शिक्षा/संयोगिक गुन्हाबदल घेतलेल्या शुल्काचा तपशील | अधिकार आरडी/ एनसीएलटी न्यायालय | अपील देणे कोणत्याही तपशीलसाठी |
|---|---|---|---|---|---|
| अ) कंपनी | | | | | |
| दंड | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |
| शिक्षा | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |
| संयोगिक गुन्हा | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |
| ब) संचालक | | | | | |
| दंड | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |
| शिक्षा | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |
| संयोगिक गुन्हा | शून्य | | शून्य | शून्य | शून्य |

| क) इतर अधिकारी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दंड<br>शिक्षा<br>संयोगिक गुन्हा | शून्य<br>शून्य<br>शून्य | | शून्य<br>शून्य<br>शून्य | शून्य<br>शून्य<br>शून्य | शून्य<br>शून्य<br>शून्य |

## परिशिष्ट ३

## बोर्ड व त्यांच्या बैठकीबाबत पुर्ण माहिती

**संचालक मंडळ -**

सद्यस्थितीत संचालक मंडळावर ०९ संचालक आहेत.

अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळावरील खालील संचालक निवृत्त झालेत. संचालक यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये महामंडळाच्या अभिवृध्दीसाठी जे योगदान दिले, त्याबद्दल महामंडळ त्यांचे आभार मानते.

| अ. न. | नांव | नियुक्तीची तारीख | निवृत्तीची तारीख |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस. डी. वानखेडे | २२/०७/२०१३ | ३१/०८/२०१४ |
| २. | श्री. डी. एस. राजुरकर | ३१/०८/२०१४ | १७/०१/२०१५ |
| ३. | श्री. यु. जी. दांगट | २/१२/२०११ | ०६/०१/२०१५ |

संचालक मंडळाच्या सभा -

अहवाल वर्ष २०१४-२०१५ मध्ये संचालक मंडळाच्या पाच सभा होऊ शकल्या, त्या खालील प्रमाणे

| अ. न. | संचालक मंडळ सभा क्रमांक | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|
| १. | १७४ वी | १६/०६/२०१४ | पुणे |
| २. | १७५ वी | २४/०८/२०१४ | पुणे |
| ३. | १७६ वी | २५/०९/२०१४ | मुंबई |
| ४. | १७७ वी | २२/११/२०१४ | पुणे |
| ५. | १७८ वी | १४/०३/२०१५ | पुणे |

**संचालक मंडळाच्या सभेसाठी उपस्थिती पत्रक -**

| अ. नं. | संचालकांचे नांव | संचालक मंडळाच्या सभा | उप समितीची सभा | वार्षिक सर्व साधारण सभा |
|---|---|---|---|---|
| | | एकूण- ५ | एकूण- २१ | १ |
| | | | | (दि.२९/१२/२०१४) |
| | | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थित |
| १. | डॉ. सुधिरकुमार गोयल, भा.प्र.से. | ५ | लागु नाही | उपस्थित |
| २. | डॉ. एस. डी. वानखेडे भा.प्र.से. | २ | १० | उपस्थित |
| ३. | श्री. डी. एस. राजुरकर, भा.प्र.से. | २ | ६ | लागु नाही |
| ४. | श्री. अरुण बी. उन्हाळे भा.प्र.से. | १ | ५ | लागु नाही |
| ५. | श्री. यु. जी. दांगट, भा.प्र.से. | ३ | २ | अनुपस्थित |
| ६. | श्री. संजय शामराव धोत्रे, खासदार | १ | ५ | उपस्थित |
| ७. | श्री. वल्लभराव टी. देशमुख | ३ | १३ | उपस्थित |
| ८. | श्री. व्ही. के. गौर | ० | लागु नाही | अनुपस्थित |
| ९. | श्री. एम. एम. शर्मा | १ | लागु नाही | अनुपस्थित |
| १०. | श्री. आर. के. माथुर | ५ | ४ | उपस्थित |
| ११. | श्री. एस. बी. खताळ | २ | ३ | उपस्थित |
| १२. | श्री. विकास व्ही. देशमुख | १ | लागु नाही | लागु नाही |

# दि.३१ मार्च २०१५रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाकरीताचे सचिवीय अंकेक्षण अहवाल

**(कंपनी कायदा २०१३ मधील कलम २०४ (१) व नियम क्र.९ कर्मचारी नियुक्ती व वेतन २०१४ अनुषंगाने )**

प्रती,
सन्मा.भागधारक,
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्या
अकोला

आम्ही वैधानिक तरतुदीचे पालन करुन आणि कंपनीचे चांगले व्यवहार ठेवलेल्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे सचिवीय विभागाचे अंकेक्षण केले आहे.कंपनी सचिवीय विभागाचे परीक्षण अशा पध्दतीने केले आहे की, मला मिळालेल्या माहीतीच्या आधारे कंपनी व्यवहार व पुर्तता बाबतचे मुल्यमापन करता आले व त्यामध्ये आमचे मत मांडता आले.

आमच्या केलेल्या परीक्षणानुसार कंपनीने अभिलेखे, मिनीटस बुक, फॉर्मस आणि कंपनीकडे व कंपनीद्वारे दाखल केलेले फार्मस व इतर रेकॉर्ड तयार करुन ठेवण्यात आलेले आहे. सचिवीय विभागाचे परीक्षणाचे वेळी महामंडळाचे अधिकारी, अधिकृत प्रतिनिधीद्वारे मिळालेल्या माहीतीच्या आधारे आम्ही कळवितो की, दि.३१ मार्च २०१५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षाकरीता कंपनीने वैधानीक तरतुदीची पुर्तता केलली आहे, तसेच कंपनीने बोर्ड प्रक्रिया व वैधानीक तरतुदीचे पालन योग्यरित्या केलेले आहे त्या बाबत सविस्तर अहवाल खालील प्रमाणे आहे.

मी महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाचे दि.३१ मार्च २०१५ रोजी तयार केलेले अभिलेखे, कागदपत्रे, मिनीटसबुक, कंपनी कार्यालयाकडे दाखल केलेले फॉर्मसचे अंकेक्षण केली आहे.

कंपनीच्या रेकॉर्डची तपासणी करतेवेळी कंपनीला लागु असलेल्या खालील प्रमाणे दर्शविलेल्या इतर कायदयाच्या संबंधीत विभागाचे तरतुदीचे पालन केल्याबाबत तपासणी करण्यात आली :-

१) कंपनी कायदा २०१३ आणि त्याचे नियम

२) इतर लागु असलेले कायदे:-

- कारखाने कायदा-१९४८
- वेतन कायदा-१९३६
- किमान वेतन कायदा-१९४८
- कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व किरकोळ तरतुदी कायदा-१९५२
- नियोक्ते राज्य विमा कायदा-१९४८

* बोनस कायदा-१९६५
* पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६
* विद्युत कायदा-२००३
* भारतीय डाक कायदा-१९९९
* उत्पन्न कर कायदा १९६१ व अप्रत्यक्ष कर कायदा
* पराक्रम्य दस्तऐवज कायदा १८८१
* ग्रॅच्युईटी पेमेंट कायदा-१९७२
* सेवाकर कायदा
* मुल्यवर्धीतकर कायदा २००५
* पाणी (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) अधिनियम १९७४ आणि अंतर्गत नियम
* हवा (प्रतिबंध आणि प्रदुषण नियंत्रण) अधिनियम १९८१ आणि अंतर्गत नियम
* साप्ताहिक सुटी कायदा-१९४२
* घातक टाकावू पदार्थ व्यवस्थापन,हाताळणी आणि वाहतुक सिमा चळवळ नियम २००८
* पेपर प्रकाशने
* औद्योगीक रोजगार (स्थायी आदेश कायदा)-१९४६
* नोंदणी कायदा-१९०८
* बियाणे कायदा -१९९६
* ट्रेडमार्क कायदा-१९९९
* पेटंट कायदा-१९७०

अहवाल वर्षामध्ये कंपनीने खालील बाबी वगळता वरील प्रमाणे नमुद सर्व कायदे, नियम अधिनियम मार्गदर्शतत्वे, मानके इत्यादीचे पालन केलेले आहे.

१) कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३५ नुसार कंपनीने कंपनीच्या सामाजीक जबाबदारी बाबतची समिती स्थापीत केलेली आहे. तथापी संचालक मंडळाने सामाजीक जबाबदारीचे धोरण बाबत सन २०१५-२०१६ मध्ये मंजुरी प्रदान केलेली असुन कंपनी कायदा कलम १३५ नुसार खर्च करावयाची रक्कम खर्च केलेली नाही.

२) अहवाल वर्षामध्ये कंपनीने कंपनी कायदा २०१३ मधील कलम १०८ नुसार कंपनीने इलेक्ट्रॉनीक माध्यमातुन मतदान प्रदान केलेले नाही.

३) अहवाल वर्षात कंपनी कायदा २०१३ मधील कलम १७७ नुसार अंकेक्षण समीती स्थापन केलेली आहे. तथापी समीतीचे कार्य स्वंतत्र संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर सुरु करण्यात

येईल. स्वंतत्र संचालक नियुक्ती करीता महाराष्ट्र सरकारकडे नामनिर्देशीत केलेले असुन महाराष्ट्र सरकारचे मत व सुचना करीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

४) अहवाल वर्षात कंपनी कायदा २०१३ मधील कलम १७८ नुसार संचालक मंडळाने नामनिर्देशन आणि मेहनताना समीती स्थापनेला मजुरी दिलेली आहे. तथापी समीतीचे कार्य स्वंतत्र संचालकाची नियुक्ती झाल्यानंतर सुरु करण्यात येईल. स्वंतत्र संचालक नियुक्ती करीता महाराष्ट्र सरकारकडे नामनिर्देशीत केलेले असुन महाराष्ट्र सरकारचे मत व सुचना करीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

आम्ही आणखी असे कळवितो की,

महाबीज ही सरकारी कंपनी असुन संस्थापन समयलेख व संस्थापन नियमावलीनुसार संचालक मंडळाची रचना केलेली आहे. स्वतंत्र संचालकाची नेमणुकीकरीता महाराष्ट्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला असुन महाराष्ट्र सरकारकडुन मत व सुचना प्राप्त न झाल्यामुळे स्वतंत्र संचालकाच्या नेमणुका प्रलंबीत आहे.

अहवाल वर्षामध्ये संचालक मंडळ गठ्ठीत करणेची कार्यवाही करण्यात आली असुन कंपनी कायदयाच्या तरतुदीनुसार फॉर्म क्र.डी.आर.१२ वेळेत भरलेले आहेत तसेच काही फॉर्म जास्तीची फी भरुन दाखल केले आहेत.

पुरेशी सुचना देउन सर्व संचालक यांना सभेची सुचना सात दिवस अगोदर पोष्टाद्वारे,ईमेलद्वारे पाठविले होते. सभेपुर्वी अजेंडा बाबतची माहीती स्पष्टीकरण घेण्यात येते व अर्थपुर्ण सहभाग सभेमध्ये असतो.

आम्ही कळवितो की, कंपनीला लागु असलेले कायदे, नियम,अधिनियम व मार्गदर्शक तत्वाची पुर्तता करणेकरीता कंपनीकडे कंपनीचा आकार व कामे विचारात घेता कंपनीकडे प्रक्रियाप्रणाली पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

आम्ही असा ही उल्लेख करतो की, कंपनी कायदा,नियम,अधिनियम आणि मार्गदर्शक तत्वाची अंमलबजावणी करतांना कंपनीमध्ये कोणतीही विशेष घटना किंवा तक्रारी उदभवल्या नाहीत.

राम ठक्कर ॲन्ड असोसिएटस् करीता

तारीख :- २६-९-२०१५

स्थान :-अकोला

राम ठक्कर

कंपनी सचीव

सी.पी.क्र.४९०३

एफसीएस क्र.७४५२

## लेखा परीक्षकांचा अहवाल

प्रति,
सन्माननिय भागधारक
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित
अकोला.

वित्तीय विवरणाबाबत अहवाल :—

आम्ही महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित (कंपनी) यांचे ३१ मार्च २०१५ चे ताळेबंद व संलग्न आर्थिक पत्रक तसेच नफा तोटा पत्रक व तरते भांडवल पत्रक (कॅश फ्लो) तसेच महत्वपुर्ण लेखाधोरण आणि इतर विवरणात्मक माहितीचे अंकेक्षण केले आहे.

वित्तीय विवरणाची व्यवस्थापनाची जबाबदारी :—

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३४(५) नूसार कंपनीचे संचालक मंडळ हे आर्थिक निवेदनासंबंधी जबाबदार आहे. कंपनी कायद्यातील कलम १३३ अंतर्गत व कंपनी (खाते) नियम २०१४ च्या नियम ७ आणि भारतीय सनदी लेखापालच्या संस्थेने विहीत केलेल्या पध्दती मांनकानूसार महामंडळाची वास्तविक स्थिती दर्शविणारे वित्तीय विवरण पत्रक, नफा तोटा पत्रक व कॅश फ्लो स्टेटमेंट (तरते भांडवल पत्रक) तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी महामंडळाच्या संचालक मंडळाची आहे. व यामध्ये महामंडळाची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याच्या दुष्टिकोनातून व आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंध करणे व ते शोधून काढण्याकरिता कायद्यातील तरतूदीप्रमाणे आवश्यक असलेले लेख्यासंबंधित कागदपत्रे योग्य लेखाधोरण निवडणे व लागू करणे, उचित व समाधानकारक अंदाज घेणे आणि अंतर्गत नियंत्रणाच्या दुष्टिने रूपरेखा तयार करणे, कार्यन्वित करणे व त्यांची देखरेख करणे, तसेच लेखे योग्य व संपूर्णपणे आणि वित्तीय विवरणे जी की महामंडळाची आर्थिक स्थिती दर्शवणारी व चुकीच्या भाष्यापासून मुक्त आहेत, नुकसान किंवा चुकीमुळे असे अंतर्गत नियंत्रण योग्यरीतीने कार्यान्वित ठेवणे.

लेखा परीक्षकाची जबाबदारी. :—

आमची जबाबदारी अंकेक्षीत वित्तीय विवरणाबाबत मत प्रदर्शीत करण्यापूरती मर्यादित ठरते. सर्वसाधारणपणे भारतात अंकेक्षणाबाबत जी मानके स्वीकृत झालेली आहे त्यानूसार अंकेक्षण केले आहे.

आम्ही कायदा कलम १४३(१०) अंतर्गत मांनकानूसार लेखापरीक्षण केले. वित्तीय विवरणपत्रे चुकीच्या भाष्यापासून मुक्त आहेत हे अंकेक्षण मानकानुसार योजना करून तपासणी करण्याची जबाबदारी आमची आहे.

वित्तीय विवरण पत्रकामध्ये नमूद असलेल्या रकमांचा व खुलाश्यांबद्दल अंकेक्षण पध्दतीप्रमाणे पुरावा घेणे हे अंकेक्षण प्रक्रियेत समाविष्ट आहे.लेखापरिक्षण करत असतांना वित्तीय विवरणात होणा–या चूकीच्या नोंदी, फसवणूक,व त्रुटी मुळे असलेल्या धोक्याचे आकलन करण्याकरिता योग्य पद्धतीचा वापर करणे हे लेखापरिक्षकांच्या निर्णयावर अवलंबून असते. या धोक्याचे आकलन करतांना, अंतर्गत वित्तीय नियंत्रण जे कि कंपनीच्या आर्थिक विवरण तयार करण्याच्या दुष्टिकोनातून निगडीत आहे आणि योग्य व चुकिच्या भाष्यापासून मुक्त आहे व लेखापरिक्षा प्रक्रिया करण्याकरीता अनुरूप आहे, असे गुहित धरावे लागते. परंतु कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची प्रभावशिलता हा उद्देश्य हेतू नाही आहे. लेखापरिक्षामध्ये कंपनीने प्रयोग केलेल्या लेखांकंन पध्दती तसेच महत्वपूर्ण लेखा अनुमानांच्या तर्क व वित्तीय विवरणाच्या खरा व योग्य दुष्टिकोन यांची खात्री करून घेणे यामध्ये समाविष्ट आहे.

आम्हाला विश्वास आहे की, वित्तीय विवरणाला एक आधार प्रदान करण्यासाठी योग्य लेखा पुरावे आमच्या लेखापरीक्षकाच्या मते प्राप्त झाले आहे.

महत्वाच्या बाबी

आमच्या अहवालात पात्र (गैर) न ठरवता खालील मुद्दयावर लक्ष वेधण्यात येत आहे.

१. वित्तीय विवरणासंबंधी स्पष्टीकरणात्मक टिपणी (टिपणी क्रं. २४ (iv) व सीएसआर उपक्रम संबधित कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३५(५) नूसार कंपनीने मागील ३ वर्षाच्या सरासरी निव्वळ नफ्याच्या २ टक्के रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. परंतू कंपनीने केवळ ४.४९ लाख रूपये सीएसआर उपक्रमावर खर्च केले.

२. वित्तीय विवरणासंबंधी स्पष्टीकरणात्मक टिपणी (टिपणी क्रं. २४ (xv)) उलट शूल्क पध्दती प्रमाणे सेवा कर लागू करण्यासंबंधी विशेषज्ञाच्या मते त्या संबंधीत काही अवघड मुद्दयावर भिन्न मत मिळत आहे. कंपनी लवकरच या संदर्भात विशेषज्ञ मत प्राप्त करून त्यानूसार पुढे उलट शूल्क व्यवहारता लागू करण्याविषयी सांगितले आहे. व त्यामुळे येणा–या परिणामावर योग्य कार्यवाही करण्यात येइल.

३. ए एस १५ नूसार कर्मचारी लाभ खात्याची प्रगटीकरण टिपणी दिली नाही.

४. ए एस २८ नूसार इम्पेअरमेंट ऑफ असेट यांचे अनुपालन केले नाही.

५. परिशिष्ट–२३ अंतर्गत टिपणी – २(७) अन्वये काही उत्पन्न व खर्चाच्या बाबीचे कॅश बेसिसवर नोंद आहे.

मत :–

आमच्या मते व आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे महत्वाच्या बाबीसोबत वाचन करतांना, वित्तीय विवरण पत्रे कंपनी कायदा अंतर्गत आवश्यक ती माहिती देतात व त्याचप्रमाणे लेखांकनाच्या भारतातील मान्य मानकानुसार कंपनीची वास्तव स्थिती प्रगट करतात.

अ) ३१ मार्च २०१५ चे कंपनीचे ताळेबंद.

ब) नफा व तोटा बाबतीत वर्षातील नफा हा त्याच वर्षाच्या शेवटच्या तारखेपर्यतचा आहे.

क) तरते भांडवल (कॅश फ्लो) च्या बाबतीत ते समाप्त होणा—या वर्षाकरीता आहे.

इतर विधी व नियमितता बाबत अहवाल :—

१. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ (११) अनुषंगीत कंपनी (ऑडीटर्स रिपोर्ट) २०१५ नुसार जी तपासणी झाली तथा जे स्पष्टीकरण प्राप्त झाले त्या आधारावर परिशिष्ट ३ व ४ प्रमाणे स्पष्टीकरण विशेष प्रपत्रात देण्यात येत आहे.

२. अधिनियम १४३(३) नूसार खालील प्रमाणे भाष्य करण्यात येत आहे.

अ) अंकेक्षणाकरीता आवश्यक असणारी सर्व माहिती व स्पष्टीकरण आम्ही मिळविली आहे.

ब) आमच्या मते, कायद्यानुसार व आमच्या परिक्षणाप्रमाणे आवश्यक असणारी लेखा पुस्तके कंपनीने ठेवली आहेत.

क) आमच्या परिक्षणानुसार लेखापुस्तके ताळेबंद, नफातोटा पत्रक व कॅश फ्लो परस्परांशी जुळतात.

ड) महत्वाच्या बाबी सोबत वाचतानां लेखा मांनकाने विहीत केलेल्या कंपनी लेखा नियम २०१४ कलम १३३ व नियम ७ अन्वये ताळेबंद, नफा तोटा पत्रक, व कॅश फ्लो विवरण तयार केले आहे

इ) संचालककांकडून लिखीत स्वरूपात प्रगटीकरण व जे संचालक मंडळात स्विकृत झाले आहे, त्या अन्वये महामंडळाचे कोणतेही संचालक दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी कंपनी कायदा २०१३ कलम १६४ व उपकलम (२) नुसार संचालक म्हणून नेमणुकीस अपात्र ठरत नाहीत.

फ) कंपनी कायदा, कंपनी (लेखा परीक्षण व लेखा परीक्षक) २०१४ च्या नियम ११ नूसार आमच्या मते व आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाचे आधारे

१) कंपनीने आपल्या आर्थिक विवरणात आर्थिक परिस्थीतीवर प्रलंबीत दावे प्रगटीकरण केले आहे. (टिपणी २मधील १५)

२) कंपनीने कोणतेही डेरीव्हेटिव व दीर्घकालीन करार केले नाही. व त्याबदल कोणतेही नुकसान नाही अशी सूचना केलेली आहे.

३) गुंतवणुकदाराचा सुरक्षा निधी हस्तांतरण करण्यात कंपनीने विलंब केला नाही.

रतन राठी ॲन्ड कंपनी करीता<br>
फर्म रजि. नं. :१०८६९८<br>
रतन के. राठी भागीदार<br>
एम क्रं ०३६४२९

स्थान : खामगाव

दिनांक : २६ सप्टेबर २०१५

## लेखा परिक्षक अहवालाबाबतचे परिशिष्ट

(आमच्या याच तारखेच्या अहवालास अनुसरून)

कंपनीच्या ३१ मार्च, २०१५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी परिच्छेद ५ मध्ये उल्लेख केला आहे.

लेखा परीक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेल्या माहिती व स्पष्टीकरणाचे आधारावर व उपलब्ध पुराव्याच्या विवक्षीत नमुना तपासणीच्या आधारावर खालील प्रमाणे भाष्य करण्यात येत आहे.

१. अ) महामंडळाने स्थावर मालमत्तेचे मात्रा, स्थळ व संपुर्ण माहिती दर्शविणारी योग्य पुस्तके ठेवली आहेत. परंतू तात्पुरते बांधकामा बद्दलची **विस्तृत** माहिती आढळून येत नाही.

ब) स्थावर मालमत्तेबाबतचे प्रत्यक्षात गणन व्यवस्थापनाव्दारे नियोजीत कार्यक्रमानूसार नियमीत व योग्य कालांतराने करण्यात आले आहे. सदर तपासणी मध्ये विशेष तफावत निदेर्शनास आल्याचे दिसत नाही. असल्यास ते लेखा पूस्तकामध्ये नोंद घेण्यात येते.

२. अ) शिल्लक साठयाचे प्रत्यक्षात गणन व्यवस्थापनाव्दारे नियमीत व कालांतराने करण्यात आले आहे.

ब) आमच्या मते व्यवस्थापनाने प्रत्यक्ष साठा तपासणीची जी पध्दती अनुसरलेली आहे, ती महामंडळाच्या व्यवहाराचे स्वरूप व आवाका लक्षात घेता योग्य व पुरेशी आहे.

क) महामंडळाने साठयाबाबतचे योग्य ती लेखा पुस्तके ठेवली आहेत. तपासणीमध्ये विशेष तफावत निदर्शनास आल्याचे दिसत नाही. असल्यास ते लेखा पूस्तकामध्ये नोंद घेण्यात येते.

३. कंपनी कायदा २०१३ कलम १८९ अंतर्गत महामंडळाने अशी कुठल्याही कंपनी व्यापारी (फर्मस) व व्यक्तींना तारणावर व विना तारणावर कुठल्याही स्वरूपात कर्ज देण्यात आलेले नाही.

४. आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती आणि स्पष्टीकरणावरून महामंडळामध्ये अंतर्गत नियंत्रण पध्दती अवलंबली आहे. महामंडळाच्या कामाची व्याप्ती व स्वरूप आवाका लक्षात घेता स्थायी संपत्ती व साहित्य खरेदी व विक्री करीता अंतर्गत नियंत्रण अपूरे वाटते. अहवाल वर्षामध्ये अंतर्गत अकेंक्षण हे खंडीत झाल्याचे आढळून आले. आमच्या मते अंतर्गत अंकेक्षण मजबूत करूण कार्यान्वित करणे हे अंतर्गत नियंत्रणासाठी आवश्यक आहे.

५. कलम ७३–७६ च्या तरतूदीमधील तत्वानूसार महामंडळाने जनतेकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या नाही.

६. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४८(१) नूसार आवश्यक असलेले परिव्यय रेकॉर्ड ठेवण्याकरिता भारत सरकारने नमूद केले नाही.

७. अ) आमच्या मते आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे अहवाल वर्षात देय असलेले वैधानिक व्यय जसेकी कर्मचारी भविष्य निधी गुंतवणूकदाराची सुरक्षा निधी, आयकर, कर्मचारी राज्य विमा, संपत्ती कर, सेवा कर, विक्री कर, आयात कर, अबकारी कर, आणि देय असलेले वैधानिक कर राशीचा भरणा नियमित स्वरूपात संबंधीत प्राधिकरणाकडे केलेला आहे.

ब) आमच्या मते व आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे, भरणा केलेले विक्री कर, आयात कर, संपत्ती कर, सेवा कर, अबकारी कर, आणि देय असलेले वैधानिक कर हे वादा बाबतचे नाही.

| थकबाकीचे स्वरूप | रक्कम (रू. लक्षात) | थकबाकी रक्कमेचा कालावधी |
|---|---|---|
| विक्री कर | २९६.६९ | आर्थिक वर्ष १९८७-८९ ते २००१-०२ |
| इतर रक्कम आणि कर | ९५.०८ | |

क) आमच्या मते व आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे गुंतवणूक सुरक्षा निधी मध्ये कोणतीही जमा करण्याची रक्कम प्रलंबीत नाही.

८. महामंडळाचा संचित तोटा नाही. व अहवाल वर्षामध्ये व त्यामागील वर्षामध्ये महामंडळास रोख नूकसान (तोटा) झालेला नाही.

९. आमच्या मते व आम्हास देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे महामंडळाने बँक आणि वित्तीय संस्थेकडील कर्जाचा भरणा करण्यात कोणतीही कसूर केलेली नाही.

१०. आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती नुसार अहवाल वर्षात महामंडळाने बँकेकडून किंवा इतर वित्तीय संस्थाकडून कर्ज घेण्याकरीता इतर व्यंक्तीना हमी दिली नाही.

११. महामंडळाने अहवाल वर्षात कोणतेही दिर्घ मूदती कर्ज घेतलेले नाही.

